Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# भारतीय पारंपारीक कला आणि शिक्षक शिक्षण : एक अभ्यास

**हर्षलता उमेश राऊत**
(ग्रंथपाल)
शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ

## सारांश

भारतीय कलेला हजारो वर्षाचा इतिहास आहे. भारतीय संस्कृती हि जगातील सर्वात प्राचीन आणि समृध्द संस्कृतीपैकी एक मानली जाते. या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यामध्ये भारतीय पारंपारीक कलांचा महत्वपुर्ण वाटा आहे. नृत्यकला, संगीत, काव्य. नाटय , चित्रकला, मुर्तिकला, सौदर्यशास्त्र, स्थापत्यकला, गोंड चित्रकला, वारली चित्रकला ,भरतकाम अशा विविधकला भारतीय सांस्कृतिक वारशाचे प्रतिक आहेत. नविन शिक्षण धोरण 2020 मध्ये शिक्षणाच्या सर्वांगीण परीवर्तनाची कल्पना केली आहे. या अभ्यासात असे दिसून येते की, कला उपक्रम , सर्जनशील, आत्मजागृकता आणि चिकित्सक विचार शक्तीला चालना देतात, ज्यामुळे भारतीय ज्ञान प्रणाली बद्दलची विद्यार्थ्यांची समज अधिक सखोल होते . हे धोरण अभ्यासक्रम सुधारणा, शिक्षक प्रशिक्षण आणि कलाकारांचा सहभाग यासारख्या उपक्रमांवर प्रकाश टाकते आणि व्यावहारीक उदाहरणे व धोरणात्मक शिफारशी सादर करते .

**मुख्य शब्द-** भारतीय पारंपारीक कला, शिक्षक शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, भारतीय ज्ञान सांस्कृतिक वारसा , कला एकात्मिक शिक्षण

## प्रस्तावना –

भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये ज्ञानाबरोबरच संस्कार, संस्कृति आणि मूल्यांना विशेष महत्व देण्यात आले आहे. भारतीय भाषा, कला आणि संस्कृतिचा प्रचार या प्रकरणात स्पष्टपणे नमुद केला आहे की, भारताच्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक संपत्तीचे जतन, संवर्धन आणि प्रसार हे देशासाठी उच्च प्राधान्य असले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 भारतीय सांस्कृतिक वारशाला सर्वांगीण शिक्षणाचा एक अविभाज्य भाग म्हणून मान्यता देते . जी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अस्मितेची भावना, आत्मविश्वास आणि सांस्कृतिक प्रतिष्ठा वाढवते. कला शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये भावनिक जागृकता, चिकित्सक विचार, सर्जनशिलता, समस्या निराकरण कौशल्य आणि व्यावहारिक शिक्षणाला प्रोत्साहन देते . हे ज्ञान विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरेची सखोल समज देतात. ज्यामुळे शिक्षण अधिक सर्वसमावेशक आणि सुसंगत बनते . त्यामुळे शिक्षक शिक्षणामध्ये भारतीय पारंपारीक कलांचे महत्व अधिक वाढते . भारतीय ज्ञान परंपरेत कलेला एक विशेष स्थान आहे. ती केवळ सृजनशील कार्यापुरती मर्यादित नसून प्राचीन गुरुकुल परंपरेपासून कला आणि शिक्षण यांचा घनिष्ठ संबंध दिसून येतो .

## अभ्यासाची उद्दिष्टे –

भारतीय पारंपारिक कलांचे शैक्षणिक महत्व समजावून घेणे .

शिक्षक शिक्षणात पारंपारिक कलांची भूमिका अभ्यासणे .

शिक्षक प्रशिक्षणात कलाधारित अध्यापनाच्या उपयुक्ततेचे विश्लेषण करणे .

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या संदर्भात कला शिक्षणाचे महत्व स्पष्ट करणे .

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

### भारतीय पारंपारिक कला –

भारतातील प्रमुख पारंपारिक कलांमध्ये भरतनाटयम, कत्थक, ओडिसी, लोकनृत्य , वारली चित्रकला, मधुबनी चित्रकला, पिथोरा कला, लोकसंगीत, हस्तकला, शिल्पकला आणि लोकनाटय यांचा समावेश होतो. या कला भारतीय संस्कृती, मूल्ये आणि परंपरा जतन करण्याचे कार्य करतात.

### शिक्षक शिक्षणातील महत्व –

**सर्जनशीलता आणि कल्पकता-** पारंपारिक कलांमुळे शिक्षकांच्या विचारसरणीत सर्जनशीलता वाढीस लागते, ज्यामुळे ते विद्यार्थ्यांना शिकवताना नवनवीन आणि आकर्षक शैक्षणिक पद्धतींचा वापर करू शकतात.

**संवाद कौशल्य** - संगीत, नाटक आणि कथाकथन या कलांमुळे शिक्षकांची संवाद साधण्याची शैली सुधारते. यामुळे वर्गखोलीतील वातावरण जिवंत आणि विद्यार्थ्यांसाठी आनंददायी बनते.

**सांस्कृतिक वारशाची जपणूक** -पारंपारिक कलांच्या माध्यमातून शिक्षक आपल्या संस्कृती, मूल्ये आणि इतिहासाची माहिती भावी पिढीपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचवू शकतात. अध्यापन अधिक आकर्षक व अनुभवाधारित बनते . सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन होते.

**मूल्य शिक्षणाचा प्रसार** – नाटय आणि प्रसंग नाटयाच्या माध्यमातून प्रामाणिकपणा, सहकार्य सामाजिक जबाबदारी, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संरक्षण यासारखी मूल्य विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविता येतात. शिक्षक प्रशिक्षणामध्ये रंगमंचाचा वापर केल्याने मूल्याधिष्ठीत अध्यापनाची क्षमता विकसित होते .

**स्वयं अध्ययनास प्रेरणा** - विविध कलांच्या माध्यमातून विद्यार्थी स्वयं अध्ययनास प्रेरीत होत असतात. जसे गायन, वादन संगीत ,हस्तकला, चित्रकला, नृत्य , नाटक इत्यादी या सर्व कला प्रकारात विद्यार्थ्यांना स्वत: खूप मेहनत घ्यावी लागते, सराव करावा लागतो. मग त्यांना प्राविण्य मिळते. प्राविण्य मिळण्यासाठी त्यांच्या स्वयं कृतीला खूप महत्व आहे. या कलाप्रकारांमुळे विद्यार्थी इतर विषयांच्याही अध्ययनाकडे स्वयंप्रेरीत होऊन अभ्यास करतात.

**विद्यार्थ्यांशी भावनिक जोडणी-** कलांचा वापर केल्याने शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील संवाद वाढतो. शिक्षक विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात, ज्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारतो.

**अध्यापन कौशल्य प्रभावी बनतात**- रंगमंचीय क्रियाकलाप शिक्षकांना विषय प्रभावी मांडण्याची कला शिकवतात. विविध प्रसंग, भूमिका आणि कलाव्दारे विषय समजावून सांगण्याची क्षमता विकसीत होते. त्यामुळे अध्यापन अधिक रंजक अनुभवधारित आणि विद्यार्थी केंद्रित बनते.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि कला शिक्षण –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये कला-संलग्न शिक्षण (Art-Integrated Learning) वर भर देण्यात आला आहे. शिक्षकांनी स्थानिक कला आणि संस्कृतीचा अध्यापनात वापर करावा, असे धोरणात नमूद केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढतो आणि शिक्षण अधिक परिणामकारक होते .

### निष्कर्ष –

भारतीय पारंपारिक कला आणि शिक्षक शिक्षण यांचा परस्परसंबंध अत्यंत महत्वाचा आहे. शिक्षक प्रशिक्षणात कलांचा प्रभावी समावेश केल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, सांस्कृतिक वारसा जपला जातो. आणि शिक्षण अधिक जीवनाभिमुख बनते . त्यामुळे शिक्षक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात भारतीय पारंपारिक कलांना योग्य स्थान देणे हि काळाची गरज आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## संदर्भ –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण् (NEP)2020, भारत सरकार

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परीषद (NCERT).

भारतीय कला आणि संस्कृती विषयावरील संदर्भग्रंथ

UGC Teacher Education Curriculum Framework

National Curriculum Framework (NCF)2005